# MUNGASAJI MAHARAJ MAHAVIDYALAYA DARWHA

**1.3.1 Institution integrates crosscutting issues relevant to Professional Ethics, Gender, Human Values, Environment and Sustainability into the Curriculum**

**Session 2016-2017**

## *Blood Donation Camp*






# रक्तदान शिबीराचा अहवाल

स्थानिक मुंगसाजी महाराज महाविद्यालय, दारव्हा येथे विद्यार्थी कल्याण विभागातर्फे दि. १९/०९/२०१६ रोजी रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले. रक्तदान शिबीराकरिता स्व. वसंतराव नाईक वैद्यकीय महाविद्यालय, यवतमाळ येथील शासकीय रक्तपेठीची चमू उपस्थित होती. यामध्ये डॉ. कुणाल चंडकापुरे, श्री. एस.बी. कुंचनकर, श्री. जीवन टापरे, श्री. प्रदीप वाघमारे, श्री. रामभाऊ सुर्यवंशी श्री. सुरेश सुरोशे यांचे सहकार्य लाभले. या शिबीरात एकूण २७ विद्यार्थ्यांनी रक्तदान केले.

रक्तदान शिबीराचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे कला शाखा प्रमुख प्रा. डॉ. सुनील चकवे यांनी स्वीकारले. आपल्या अध्यक्षीय भाषणात त्यांनी रक्तदानाचे महत्त्व विषद करून विद्यार्थ्यांना रक्तदान करण्यास प्रोत्साहित केले. उद्‌घाटक म्हणून डॉ. कुणाल चंडकापुरे रक्तसंक्रमण अधिकारी, शासकीय रक्तपेठी, स्व. वसंतराव नाईक वैद्यकीय महाविद्यालय,यवतमाळ हे उपस्थित होते. उपप्राचार्य डॉ. विलास राऊत, डॉ. सुभाष जाधव हे प्रमुख पाहुणे होते. कार्यक्रमाचे संचालन डॉ. अरविंद लाडोळे यांनी केले. आभार प्रदर्शन डॉ. मनिष मोहरील यांनी केले

शिबीराचे आयोजन व यशस्वीतेसाठी विद्यार्थी कल्याण विभागातर्फे प्रा. डॉ. अरविंद लाडोळे, प्रा. डॉ. संतोष चतुर, प्रा. डॉ. शंकर सावंत, प्रा. डॉ. मनिष मोहरील, प्रा. सुनील डंभारे, प्रा. नितीन भिंगारे, प्रा. संदीप भुरले, श्री. अशोक ढोक यांनी अथक प्रयत्न केले.

प्राचार्य

Principal
Mungsaji Maharaj Mahavidyalay
Darwha, Dist. Yavatmal

सोबत :–

१) रक्तदात्यांची यादी

२) रक्तदान शिबीराचे फोटो व बातमी

## *Tree Plantation*





## *Fund collection rally for Flood in Kerala*





# Report of Guidance Programme on "Cancer Awareness"

## Women Development Cell

Mungsaji Maharaj Mahavidyalaya, Darwha

Name of Activity- **Guidance Programme**

Topic of Activity- **"Cancer Awareness"**

Invited Guest - **Dr. Ashwini Bhende**

Venue of Activity- **Seminar Hall**

Date & Time –**05 Feb 2016**

A guidance programme for Arts, commerce & science faculties student was organized on **05 Feb 2016** by Women Development Cell, Mungsaji Maharaj Mahavidyalaya, Darwha. Dr. Sau. S.V.Ghuikhedkar, Principal M. M. College, Darwha was the President, Dr. Ashwini Bhende was the chief guest of the programme, while Prof. PB Ruikar, Prof. S.S Gawande and Prof. Labsetwar. Prof. Kumre, Prof Thakare were present in the programme.

Dr.N.A.Rashidi, HOD Chemistry, M.M.College, Darwha, Co-ordinator of Women Development Cell conducted the whole programme, introduced the guest as well as explained the need and the importance of ***Health Care for Women***, as she carrying the dual responsibily in today's era in her introductory speech. Dr. Ashwini Bhende made the students aware about "Cancer" by giving them basic information, symptoms, causes and precautions. Dr. Sau. S.V.Ghuikhedkar also made them aware of different types of Cancer in her presidential speech. Prof.Quresi conducted the whole programme, Prof. P.B Ruikar carried the responsibility of Vote of Thanks. Students also showed the big response to the programme by their presence.

**Co-ordinator**
Women Development Cell

**Principal**
M.M. College,Darwha

**Session 2017-2018**

***Yoga Photographs***





यवतमाळ : नेहरू स्टेडियमवर झालेल्या कार्यक्रमात सहभागी तनिष्का सदस्य.



नेर : क्रीडा संकुलात योगासने करताना तनिष्का सदस्य व इतर.



दारव्हा : योगासने करताना तनिष्का सदस्य व इतर.

# यवतमाळ, नेर, दारव्हा येथे तनिष्कांचे योगासन

## चौथा आंतरराष्ट्रीय योगदिन, आर्ट ऑफ लिव्हिंगचा सहभाग, प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनात केली योगासने

**सकाळ वृत्तसेवा**

यवतमाळ, ता. २१ : चौथ्या आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त यवतमाळ, नेर, दारव्हा येथे गुरुवारी (ता.२१) सकाळी सहा ते आठ या वेळेत योगदिन कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमात 'सकाळ माध्यम समूह'च्या स्त्री प्रतिष्ठा अभियानच्या असंख्य तनिष्का सदस्यांनी योगासने केली. आर्ट ऑफ लिव्हिंगच्या सदस्यांचाही यात सहभाग होता.

यवतमाळच्या नेहरू स्टेडियमवर झालेल्या योगदिन कार्यक्रमात योगशिक्षिका सुनंदा गवळी यांच्या मार्गदर्शनात प्रज्ञा मुमकाळे, अनिता खडसे, प्रांजली राऊत, राणू भीतकर या तनिष्का सदस्यांसह प्रदीप उमरे, गजानन बिल्लावार, मयुर पिंपळकर, श्रुती पिंपळकर, विद्या राठोड, शकुंतला प्रजापती, नंदा देठे, लता मडावी, सुनंदा भगे, ममता आस्वानी, निलिमा पाटील, दीपिका मानकर यांनी योगासने केली. कार्यक्रमासाठी तनिष्का जिल्हा समन्वयक राधिका आव्हाड यांनी पुढाकार घेतला.

दारव्हा : येथील मुंगसाजी महाराज महाविद्यालयाच्या प्रांगणात झालेल्या कार्यक्रमात योग दिनाचे महत्त्व पटवून देत विविध योग करीत येथील तनिष्का गटाच्या वतीने योगदिन साजरा करण्यात आला. प्रमुख मार्गदर्शक म्हणून तनिष्का सदस्य डॉ. अश्विनी भेंडे यांनी योगाचा मानवी शरीरावर होणारा सकारात्मक परिणाम याबाबत माहिती दिली. कार्यक्रमाला प्राचार्य डॉ. विलास राऊत, तालुक्यातील तनिष्का गटप्रमुख प्रा. सुषमा गावंडे, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ. शंकर सावंत, शारीरिक शिक्षण विभाग प्रमुख प्रा. सुनील डंभारे यांच्यासह येथील तनिष्कच्या सदस्या प्रा. प्रियंका रईकर, प्रा. अश्विनी शेळके, प्रा. वैशाली कुंमरे, डॉ. कांचन नरवडे, शीतल ठाकरे, माधवी नरवडे, वंदना नाईकवाड आदींसह महिला व प्राध्यापक, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

नेर : येथील क्रीडा संकुलात सकाळी सात ते नऊ या वेळेत योगदिन कार्यक्रम घेण्यात आला. कार्यक्रमात तनिष्का सदस्य वैशाली मासाळ, ॲड. रश्मी पेटकर, डॉ. शोभा नरोटे, अश्विनी जयसिंगपुरे, रंजना गायनर, जय उघडे, माया राणे, वनिता मिसळे, मनीषा मिसळे, गीतांजली सहारे यांनी सहभाग घेतला होता.

# *Cleanliness/Environment Programme Photographs*

**Pani Foundation Exhibition Visit**
**Date : 21-12-2017**






## *Gandhi Vichar Examination Award*



गाँधी रिसर्च फाउण्डेशन

गाँधी तीर्थ, जैन हिल्स, जलगाँव – ४२५००१.

www.gandhifoundation.net

गांधी विचार संस्कार परीक्षा

२०१७-१८

यशस्वी आयोजन हेतु

स्मृतीचिन्ह

मुंगसाजी महाराज महाविद्यालय,

दारव्हा, ता. दारव्हा, जि. यवतमाळ

***Gram Swachhata Photographs***

**Swachhata Hich Sewa Pandharwada**
**Date:- 15-09-2017 to 02-10-2017**









# देशात बळीराजाचे राज्य निर्माण करा

## कवी ज्ञानेश वाकुडकर : मुंगसाजी महाराज महाविद्यालयात व्याख्यान



दारव्हा : मार्गदर्शन करताना कवी प्रा. ज्ञानेश वाकुडकर.

सकाळ वृत्तसेवा

दारव्हा, ता. २२ : "या जगात क्रांती सामान्य लोकांनीच केली, हे डोळ्यापुढे ठेवून शेतकऱ्यांच्या मुलांनी देशाचे प्रतिनिधित्व करण्यासाठी नेतृत्व करावे. या हेतूने शेतकरी युवकांनी बळीराज्याचे राज्य निर्माण करण्यासाठी प्रयत्न करावेत,' असे आवाहन कवी प्रा. ज्ञानेश वाकुडकर यांनी केले.

येथील मुंगसाजी महाराज महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे 'बळीराज्याच्या मुक्त' या विषयावरील संवादयात्रेचा स्वागतपर कार्यक्रम नुकताच झाला, त्यावेळी प्रमुख वक्ते म्हणून कवी प्रा. वाकुडकर बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. विलास राऊत होते. बाळासाहेब घुईखेडकर विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष वसंत घुईखेडकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

प्रा. वाकुडकर म्हणाले की, 'आतापर्यंत होऊन गेलेली सरकारे व विद्यमान सरकार यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नांचा विचार केला नाही. शेतकरी बापाची व्यथा व वरून सरकारची उदासीनता, धोरणांमुळे शेतकरी व युवकांमध्ये प्रचंड संताप आहे. श्रीमंतांच्या वाहनांसाठी सिमेंटचे रोड आहेत आणि जो शेतकऱ्यांचा मित्र आहे तो आमचा मित्र अशा वृत्तीने शेतकरी मुलांनी वागावे.

राष्ट्र म्हणजे राष्ट्रातील लोक, राष्ट्राची प्रगती म्हणजे राष्ट्रातील लोकांची प्रगती. मात्र, आज आम्ही राष्ट्राची प्रगती झाली, असे म्हणतो. मात्र, या राष्ट्राला जगाचा पोशिंदा शेतकरी राजा ज्यांच्यापोटी आहे, तो आत्महत्या करत आहे. म्हणून शेतकऱ्यांच्या मुलांनी जागे व्हा', असे आवाहनही वाकुडकर यांनी केले. घुईखेडकर यांनीही मार्गदर्शन केले. प्राचार्य राऊत यांनी शेतकरीहिताचे सरकार निर्माण करण्याचे कार्य आजच्या युवकांनी करावे, असे आवाहन केले.

सूत्रसंचालन रसेयोचे कार्यक्रम अधिकारी डॉ. शंकर सावंत यांनी केले. प्रास्ताविक महादेव मिरगे यांनी केले. प्रा. प्रियंका रुईकर यांनी आभार मानले. प्रा. अख्तर उबेसा कुरेशी आदींनी कार्यक्रमासाठी पुढाकार घेतला.

## *Tree Plantation*

**Date:- 01-07-2017**











लोकमत

### मुंगसाजी महाविद्यालय, दारव्हा

दारव्हा - येथील मुंगसाजी महाराज महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना पथक आणि हॉर्टिकल्चर विभागाच्यावतीने सावखेडा येथे वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. प्राचार्य डॉ. विलास राऊत यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. यावेळी १८० वृक्षांची लागवड करण्यात आली. यावेळी रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. शंकर सावंत, डॉ. मनीष मोहरील, प्रा. प्रियंका रुईकर, प्रा. कुरेशी, डॉ. सुनील चाकवे, डॉ. अरविंद लाडोळे, डॉ. सुनील आवने, प्रा. जयकुमार शिरभाते, डॉ. संजय राऊत, डॉ. संतोष चतुर, प्रा. खुशाल ढवळे, प्रा. सुनील डंभारे, प्रा. संदीप भुरले, प्रा. नितीन भिंगारे, प्रा. सचिन ताचडे, प्रा. धीरण राठोड, सुधीर सोनोने, गोविंद डोईफोडे, मनीष लांजेवार, गजानन ईरवे, गजानन मानतुटे, राजीव मनवर, अशोक ढोक, संतोष इंगोले, मंगेश धुरंधर, अभिजीत लढवे, धरम ठाकूर,

Hello Yavatmal

Page No. 3 Jul 13, 2017

Powered by: erelego.com

## *Awareness Programmes*





हॅलो यवतमाळ ०४- मार्च २०१७

# दारव्हा येथे महिला सक्षमीकरण कार्यशाळा

दारव्हा : राज्य महिला आयोग, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ आणि मुंगसाजी महाराज महाविद्यालयाच्यावतीने येथे महिला सक्षमीकरणावर कार्यशाळा घेण्यात आली. कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ अधिनियम-२०१३ ची अंमलबजावणी या विषयावर मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी शिक्षक, कर्मचारी, विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.

अध्यक्षस्थानी डॉ. संगीता घुईखेडकर होत्या. प्रमुख वक्ते ठाणेदार अनिलसिंह गौतम, ॲड. संतोषी कथले, व्यसनमुक्ती प्रचारक देवराव राठोड, तर प्रमुख अतिथी म्हणून प्राचार्य व्ही.बी. राऊत, प्रा. अजय दुबे, प्रा. के.के. हुरडे, डॉ. एस.बी. चकवे आदी उपस्थित होते.

कोणत्याही घटकाकडून कामाच्या ठिकाणी किंवा महाविद्यालयामध्ये महिलांसोबत काही गैरवर्तन किंवा छळाच्या घटना घडल्यास तक्रारकर्त्यांनी बिनधास्तपणे पुढे यावे, असे आवाहन ठाणेदार गौतम यांनी यावेळी केले.

महिला जोपर्यंत निर्भयतेने आपल्यावर झालेल्या अन्यायाची तक्रार घेऊन पुढे येणार नाही तोपर्यंत कायदे हे कुचकामी ठरतात, असे मत ॲड. संतोषी कथले यांनी यावेळी व्यक्त केले. प्रसंगी देवराव राठोड यांनीही मार्गदर्शन केले. प्रास्ताविक डॉ. नाझिया रशिदी, संचालन व आभार प्रा. प्रियंका रुईकर यांनी मानले.

या कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी मुंगसाजी महाराज महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आदींनी पुढाकार घेतला. यावेळी विद्यार्थ्यांचीही उपस्थिती होती. (तालुका प्रतिनिधी)





मुंगसाजी महाराज महाविद्यालय, दारव्हा

# एक दिवसीय जाणीव जागृती कार्यशाळा

मुंगसाजी महाराज महाविद्यालय, दारव्हा येथे दि.२७/२/२०१७ ला महाराष्ट्र राज्य महीला आयोग मुंबई, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती आणि मुंगसाजी महाराज महाविद्यालय, दारव्हा यांच्या संयुक्त विद्यमाने एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आलेले आहे.

## * कार्यशाळेचा विषय *

**कामाच्या ठिकाणी महीलांचे लैंगिक छळापासुन सरंक्षण (प्रतिबंध,मनाई आणि निवारण) अधिनीयम २०१३ च्या अमलबजावणी बाबत. एक दिवसीय जाणीव जागृती कार्यशाळा**

**प्रमुख वक्ते :**

**मा.श्री. अखिलसिंह गौतम,** ठाणेदार पोलीस स्टेशन दारव्हा

**मा. सौ.ॲड. संतोषी कथले,** दारव्हा

**मा.श्री. देवरावजी राठोड,** व्यसनमुक्ती प्रचारक (पोलीस हेडकॉन्स्टेबल)

**कार्यक्रमाचे अध्यक्ष:**

**डॉ.सौ.संगीताताई घुईखेडकर** सचिव, विद्या प्रसारक मंडळ, दारव्हा

## * तारीख व वेळ *

सोमवार दि. २७/२/२०१७ ला सकाळी १०.३० वाजता

स्थळ : स्व.बाळासाहेब घुईखेळकर परिषद गृह, मुंगसाजी महाराज महाविद्यालय, दारव्हा

वरील संदर्भान्वये शाळा, महाविद्यालयातील विद्यार्थी,विद्यार्थीनी तसेच शिक्षक आणि कर्मचारी यांनी उपस्थित रहावे हि विनंती.

*** आयोजक ***

**प्राचार्य तथा अंतर्गत तक्रार समिती(ICC)**

**मुंगसाजी महाराज महाविद्यालय, दारव्हा**

टिप : कार्यक्रमात सर्व सहभागी विद्यार्थी, शिक्षक, आणि कर्मचारी यांना प्रमाणपत्र देण्यात येईल.

**Session 2018-2019**

*Yoga Photographs*





## *Cleanliness/Environment Programme Photographs*

**NSS Day**
**24-09-2018**




# रासेयो दिनानिमित्त स्वच्छता जनजागृती व्याख्यान




**शहर प्रतिनिधी / २८ सप्टेंबर**

**दारव्हा :** स्थानिक मुंगसाजी महाराज महाविद्यालय येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागाव्दारे रासेयो दिनानिमित्त स्वच्छता जनजागृती व्याख्यान व उद्बोधन वर्गाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कला शाखा प्रमुख डॉ. सुनिल चकवे तर प्रमुख वक्ते म्हणुन प्राचार्य विजय गावंडे, इश्वर देशमुख महाविद्यालय दिग्रस व डॉ. संतोष चतुर तर प्रमुख उपस्थितीमध्ये प्रा.संदिप भुरले उपस्थित होते.

याप्रसंगी प्रमुख वक्ते विजय गावंडे यांनी रासेयो निर्मितीचा इतिहास व रासेयोच्या माध्यमातुन केले जाणारे कार्य विद्यार्थ्यांना सांगितले. डॉ. संतोष चतुर यांनी रासेयो म्हणजे समाज सेवा करण्याचा ध्यास व स्वताचे व्यक्तीमत्व घडविण्याचा ध्यास असल्याचे सांगितले. डॉ. सुनिल चकवे यांनी रासेयोचे व्यासपीठ हे विकासाचे असून, त्याचा वापर विद्यार्थ्यांनी स्वतःच्या विकासासाठी करावा असे आवाहन केले. प्रास्ताविक डॉ. शंकर सावंत यांनी केले तर संचालन मंगेश धुरंधर व आभार प्रदर्शन प्रियंका रुईकर यांनी केले. यशस्वीतेसाठी डॉ. मनिष मोडरीस, प्रा. कु. अखतउन्नीसा कुरेशी यांनी परिश्रम घेतले.

Sat, 29 September 2018
deshonnati.digitaledition.in/c/32644446

**‘Save Water Save Tree’ Programme**
**Date:- 22-09-2018**



# मुंगसाजी महाराज महाविद्यालय, दारव्हा

दारव्हा - येथील मुंगसाजी महाराज महाविद्यालयात नेर येथील नेहरु महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे 'सेव्ह वॉटर-सेव्ह ट्री' कार्यक्रम घेण्यात आला. अध्यक्षस्थानी डॉ.सुनील चकवे होते. डॉ.विष्णू कुटे, डॉ.व्ही.ए.खोडस्कर, डॉ.पी.एच.चव्हाण यांनी मार्गदर्शन केले. संचालन मंगेश धुरंधर, प्रास्ताविक रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ.शंकर सावंत यांनी तर आभार प्रा.प्रियंका रुईकर यांनी मानले. यशस्वीतेसाठी डॉ.संतोष चतुर, प्रा.संदीप भुरले, प्रा.नितीन भिंगारे, प्रा.रवी बोरकर, प्रा.अख्तरउन्निसा कुरेशी यांनी परिश्रम घेतले.

Hello Yavatmal
Page No. 3 Nov 06, 2018
Powered by: erelego.com

\





# मु.म. महाविद्यालयात सेव्ह वॉटर सेव्ह ट्री कार्यक्रम

***शहर प्रतिनिधी*** / २४ सप्टेंबर

**दारव्हा :** मुंगसाजी महाराज महाविद्यालय दारव्हा येथे रासेयो विभागाव्दारे व नेहरू महाविद्यालय नेर यांचे संयुक्त विद्यमाने सेव्ह वॉटर सेव्ह ट्री कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. अध्यक्षस्थानी कला शाखा प्रमुख डॉ. सुनिल चकवे, प्रमुख वक्ते म्हणून विष्णू कुटे, डॉ. व्ही. ए. खोडस्कर, डॉ.पी. एच. चव्हाण, नेहरू महाविद्यालय, नेर आदि उपस्थित होते.

याप्रसंगी डॉ. विष्णू कुटे यांनी जंगल व पाणी मानवी जीवनातील महत्व या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. डॉ. पी.एच. चव्हाण यांनी विद्यार्थ्यांना आवाहन केले की, जल व जंगल संवर्धन व संरक्षण करीता ज्वारीचा दाणा किंवा खारीचा वाटा उचलावा असे प्रत्येकाने केल्यास जल व जंगलाचे संरक्षण व संवर्धन होईल व आपले जीवन सुखी समाधानी होईल. डॉ. व्ही.पी. खोडस्कर यांनी प्रेझेंटेशनव्दारे जल व जंगलाचे महत्व विद्यार्थ्यांना पटवून दिले.

अध्यक्षीय भाषणामध्ये कला शाखा प्रमुख डॉ. सुनिल चकवे यांनी जल व जंगलाचे संवर्धन व संरक्षन करणे ही आज काळाची गरज आहे असे विचार व्यक्त केले. मान्यवरांनी मुंगसाजी महाराज महाविद्यालयातील प्राध्यापक मंडळींनी रोपटे भेट देवून त्यांचे रोपन करून संवर्धन व संरक्षण करावे अशी विनंती केली. संचालन मंगेश धुरंधर, प्रास्ताविक रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. शंकर सावंत तर आभार प्रदर्शन रासेयो महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. कु. प्रियंका रूईकर यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीत करीता महाविद्यालयातील डॉ. सुनिल चकवे, डॉ. संतोष चतुर, प्रा. संदिप भुरले, प्रा. नितीन भिगारे, प्रा. रवि बोरकर, प्रा. कु. प्रियंका रूईकर, प्रा. कु. अख्तरउन्नीसा कुरेशी आदि प्राध्यापक वर्ग व महाविद्यालयातील बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.

Tue, 25 September 2018
deshonnati.digitaledition.in/c/32528280

**‘Swachhata Hich Sewa’**
**Date:- 15-09-2018 to 02-10-2018**










राष्ट्रीय सेवा योजना
स्वच्छता पंधरवाडा
दत्तक ग्रामात स्वच्छता जनजागृती






# मु.म. महाविद्यालयात रोजगाराभिमुख कौशल्य विकास कार्यशाळा



**शहर प्रतिनिधी** / १८ सप्टेंबर

**दारव्हा** : मुंगसाजी महाराज महाविद्यालय येथे रासेयो व सांस्कृतिक विभागाद्वारा रोजगाराभिमुख कौशल्य विकास कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. प्रमुख वक्ते सागर धर्माधिकारी, नाशिक तर अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. विलास राऊत, प्रमुख उपस्थितीमध्ये कला शाखाप्रमुख डॉ. सुनिल चकवे, डॉ. प्रशांत बागेश्वर, डॉ. सुभाष जाधव, डॉ. संतोष चतुर, डॉ. शंकर सावंत, प्रा. सदिप भुरले, प्रा. रवि बोरकर, प्रा. कु. प्रियंका रुईकर, प्रा. कु. अख्तरउन्नीसा कुरेशी आदि प्राध्यापक उपस्थित होते. प्रमुख वक्ते सागर धर्माधिकारी यांनी कौशल्य भारत योजनेची माहिती विद्यार्थ्यांना दिली. तसेच या सर्व कौशल्य विकास प्रशिक्षण यापुढील कालावधीत आपल्याच महाविद्यालयात उपलब्ध होणार असून ते प्रशिक्षण विद्यार्थ्यांनी कशाप्रकारे घ्यावे याचे सुध्दा मार्गदर्शन केले. त्यानंतर अध्यक्षिय भाषणामध्ये प्राचार्य डॉ. विलास राऊत यांनी विद्यार्थ्यांनी कौशल्य विकास प्रशिक्षण शिबिराचा लाभ घेवून स्वताचा रोजगार निर्माण करावा असे आवाहन केले. संचालन रासेयो स्वयंसेवक मंगेश धुरंधर तर प्रास्ताविक डॉ. प्रशांत बागेश्वर व आभार प्रदर्शन रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. शंकर सावंत यांनी केले. यशस्वितेसाठी विकास पाईकराव, मंगेश धुरंधर, विक्रम गिरी, अभिजीत लडबडे, कु. राधिका कोळापे, कु. कल्याणी गेडाम, कु. आरती लोखंडे आदिंनी परिश्रम घेतले.

Wed, 19 September 2018
ePaper देशोन्नती deshonnati.digitaledition.in/c/32330870

# रोगगाराभिमुख कौशल्य विकास कार्यशाळा



दारव्हा, दि.२८
(तालुका प्रतिनिधी)

दिनांक १८ सप्टेंबर २०१८ रोजी मुंगसाजी महाराज महाविद्यालय दारव्हा येथे राष्ट्रीय सेवा योजना व सांस्कृतीक विभागाद्वारा रोजगाराभिमुख कौशल्य विकास कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी प्रमुख वक्ते सागर धर्माधिकारी, नाशिक हे होते तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाने

प्राचार्य डॉ. विलास राऊत तर प्रमुख उपस्थितीमध्ये कला शाखाप्रमुख डॉ. सुनिल चक्वे, डॉ. प्रशांत बागेश्वर, डॉ. सुभाष जाधव, डॉ. संतोष चतुर, डॉ. शंकर सावंत, प्रा. संदिप भुरले, प्रा. रवि बोरकर, प्रा.कु. प्रियंका रुईकर, प्रा. कु. अख्तरउन्नीसा कुरेशी आदि प्राध्यापक वर्ग उपस्थित होते. याप्रसंगी प्रमुख वक्ते सागर धर्माधिकारी यांनी कौशल्य भारत योजनेची माहिती विद्यार्थ्यांनी दिली. तसेच कौशल्य भारत योजनेच्या माध्यमातून चालणाऱ्या ब्युटीपार्लर, बिजनेस ॲन्ड मॅनेजमेंट, टुरिझम, आय.बी.बी.एस. बँकींग आदिच्या संदर्भातील कौशल्य विद्यार्थ्यांनी कसे अवगत करावे याचे सविस्तर ज्ञान त्यांनी आपल्या विचारातुन विद्यार्थ्यांनी कौशल्य विकास प्रशिक्षण शिबिराचा लाभ घेऊन स्वताचा रोजगार निर्माण करावा असे आवाहन केले. कार्यक्रमाचे सुत्र संचालन रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. शंकर सावंत यांनी केले तसेच कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरीता विकास पाईकराव, मंगेश धुरंधर, विक्रम गिरी, अभिजीत लडबडे, कु. राधिका कोळापे, कु. कल्याणी गेडाम, कु. आरती लोखंडे आदिंनी अथक परिश्रम घेतले.

# स्वच्छता हीसेवा अंतर्गत विविध कार्यक्रम



**प्रतिनिधी** / २६ ऑक्टोबर

**दारव्हा:** स्थानिक मु.म. महाविद्यालय येथे रासेयो विभागाद्वारे १५ सप्टेंबर ते २ आक्टोबर २०१८ या दरम्यान स्वच्छता ही सेवा अंतर्गत विविध कार्यक्रम पार पडले. २२ सप्टेंबरला पर्यावरण संरक्षण व संवर्धनाकरीता नेहरू महाविद्यालय नेर व मुंगसाजी महाराज महाविद्यालय दारव्हा यांचे संयुक्त विद्यमाने सेव्ह वॉटर सेव्ह ट्री या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी अध्यक्षस्थानी कला शाखा प्रमुख डॉ. सुनिल चक्वे, प्रमुख वक्ते डॉ. विष्णु कुटे, डॉ. व्ही.पी. खंडस्कर, डॉ.पी. एच. बकाल आदी उपस्थित होते. याप्रसंगी मान्यवरांनी मार्गदर्शन करून वृक्षारोपण केले. २४ सप्टेंबरला रासेयो दिनानिमित्त स्वच्छता जनजागृती व्याख्यान व उदबोधन वर्ग आयोजन करण्यात आले याप्रसंगी अध्यक्षस्थानी कला शाखा प्रमुख डॉ. सुनिल चक्वे, प्रमुख वक्ते डॉ. विनोद गावंडे ईश्वर देशमुख महाविद्यालय दिग्रस, डॉ. संतोष चतुर, प्रा. संदीप भुरले आदी उपस्थित होते. याप्रसंगी मान्यवरांनी मार्गदर्शन केले. २५ सप्टेंबरला मुंगसाजी महाराज महाविद्यालय दारव्हा व कृषी विज्ञान केंद्र, सावंगी येथे यांचे संयुक्त विद्यमाने टाकाऊ पासून टिकाऊ वस्तु तयार करणे या विषयावर मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आली. याप्रसंगी प्रत्यक्ष प्रात्यक्षिकाद्वारे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यानंतर २६ सप्टेंबरला दारव्हा येथील बस स्टँड परिसरात स्वच्छता रॅली त्यामध्ये परिसरातील गवत काढणे, परिसर झाडून साफ करणे व परिसरातील प्लॅस्टिकच्या पिशव्या गोळा करून त्या नष्ट करणे आदी स्वच्छता केली. २७ व २९ सप्टेंबर व १ अक्टोबर दरम्यान पुन्हा महाविद्यालय परिसरात स्वच्छता केली. २८ सप्टेंबरला दत्तक ग्राम डेऊळगाव वळसा येथे एकदिवसीय शिबिराचे आयोजन करण्यात आले. गावातुन स्वच्छता रॅली काढून गावा स्वच्छतेचा संदेश दिला, त्यानंतर गावाच्या प्रमुख चौकात रासेयो स्वयंसेवकांनी पथनाट्य सादर करून पथनाट्याच्या माध्यमातून गावकऱ्यांना स्वच्छतेचा संदेश दिला. शेवटी २ आक्टोबरला गांधी जयंतीचा कार्यक्रम घेऊन स्वच्छता ही सेवा अंतर्गत विविध कार्यक्रम पार पडले.

हे सर्व कार्यक्रम प्राचार्य डॉ. विलास राऊत यांचे मार्गदर्शनात कार्यक्रम अधिकारी डॉ. शंकर सावंत, सहाय्यक कार्यक्रम अधिकारी डॉ. मनिष मेंढोले, महिला कार्यक्रम अधिकारी प्रा.कु. प्रियंका रुईकर, प्रा.कु. अख्तरउन्नीसा कुरेशी आदींनी रासेयो स्वयंसेवकांच्या सहकार्याने पार पडले.

Sat, 27 October 2018
ePaper देशोन्नती deshonnati.digitaledition.in/c/33449926

**Swachhata Pandharwada**
**(01-08-2018 to 15-08-2018)**













# सकाळ

## मुंगसाजी महाविद्यालय स्वच्छता पंधरवडा

**दारव्हा :** एक ते १५ ऑगस्टदरम्यान येथील मुंगसाजी महाराज महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाद्वारे स्वच्छता पंधरवाड्यानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यात सुरुवातीला महाविद्यालयाचा परिसर संपूर्णपणे साफ केला. त्यामध्ये महाविद्यालय परिसरात वाढलेले गवत साफ करणे वर्ग खोल्या साफ करणे, महाविद्यालयाला लागून असलेल्या रस्त्यालगतचे गवत साफ करणे, कचरा गोळा करून पेटवून देणे, महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना स्वच्छतेची, वृक्षरक्षा व संवर्धनाची शपथ देणे आदी स्वच्छता या विषयावर व्याख्यान आदी कार्यक्रमांचे आयोजन केले होते. व्याख्यानात डॉ. संतोष चतुर यांनी विद्यार्थ्यांना स्वच्छतेविषयी माहिती दिली. आयोजनात प्राचार्य डॉ. विलास राऊत व महाविद्यालयाच्या सचिव डॉ. संगीता घुईखेडकर यांच्या मार्गदर्शनात 'रासेयो'चे कार्यक्रम अधिकारी डॉ. शंकर सावंत, सहायक कार्यक्रम अधिकारी डॉ. मनीष मोहरील, महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. प्रियांका रुईकर, प्रा. अखतर उन्नीसा कुरेशी व स्वयंसेवकांनी पुढाकार घेतला.

Nagpur, Yavatmal-Today
21/08/2018 Page No. 3

**Takau Pasun Tikau (Best from Waste)**
**Date:- 25-09-2018**



२८/०९/२०१८ यवतमाळ शहर विशेष सिंहझेप

पान २

## टाकाऊ वस्तु पासून टिकाऊ वस्तू बनविल्याने प्रदुषण दुर होते - नम्रता राजस

दारव्हा - ता. प्र.

टाकाऊ वस्तु पासून आपल्या उपयोगात येणाऱ्या व टिकाऊ वस्तू कश्या निर्माण करता येतील याचे मार्गदर्शन करतांना टाकाऊ वस्तुंचा उपयोग टिकाऊ वस्तु निर्माण करण्यासाठी केल्यास प्रदुषण निर्माण होणार नाही या दृष्टीने प्रयत्न करावे असे आवाहन प्रमुख मार्गदर्शिका नम्रता राजस यांनी केले. स्थानिक मुंगसाजी महाराज महाविद्यालय येथे राष्ट्रीय सेवा योजना विभाग व कृषि विज्ञान केंद्र सांगली रेलवे यांचे संयुक्त विद्यमाने टाकाऊ पासून टिकाऊ वस्तु तयार करणे या विषयावर आयोजित कार्यशाळेत बोलत होत्या. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे कला शाखा प्रमुख डॉ. सुनिल चकवे, दारव्ह्याचे वासुदेव चांदुरकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

या प्रसंगी सुनिल चकवे यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. प्रास्ताविक डॉ. वासुदेव चांदुरकर यांनी



केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा. प्रियंका रुईकर यांनी तर आभार प्रदर्शन प्रा. शंकर सावन यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. शंकर सावन, प्रियंका रुईकर, डॉ. संतोष चतुर व राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांनी अथक परिश्रम घेतले.

# Tree Plantation

# Date:- 04-09-2018







मुंगसाजी महाराज महाविद्यालय दारव्हा

## ठिकठिकाणी वृक्षारोपण

**प्रतिनिधी** / ३ जुलै

**दारव्हा** : वृक्षारोपण सप्ताहांतर्गत २ जुलैला स्थानिक मुंगसाजी महाराज महाविद्यालय येथे रासेयो विभागातर्फे वृक्षारोपणाचा कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी संस्थेचे अध्यक्ष मा.वसंतराव घुईखेडकर यांनी वृक्षारोपण करुन कार्यक्रमाची सुरुवात केली. प्रमुख पाहुणे म्हणून विभागीय अधिकारी पांडे यांनी सपत्निक वृक्षारोपण केले.

तसेच संस्थेच्या सचिव डॉ. सौ. संगितालाई घुईखेडकर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. बी. राऊत, डॉ. चतुर, डॉ. आखरे, कार्यक्रम अधिकारी डॉ. सावंत, सहा.कार्यक्रम अधिकारी डॉ. मोहरील, महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. कु. रुईकर, प्रा. कु. कुरेशी, डॉ. कु. रशिदी, प्रा. वाकोडे, प्रा. सौ. गावंडे, प्रा. सौ. महल्ले, प्रा. डॉ. जाधव डॉ. चकवे, प्रा. बोरकर, प्रा. भुरले, प्रा. कु. कुमरे, प्रा. ढवळे, प्रा. भिंगारे, डॉ. लाडोळे, यांनी ही वृक्षारोपण कार्यक्रमात सहभाग नोंदवला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरीता विकास पाईकराव, मेहुल गोहेल, रुपेश वाढोणकर, वैभव माने, सागर भरभडे, सावंत, वैद्य आदींनी परीश्रम घेतले.

### पत्रकार संघटना झरी

**प्रतिनिधी** / ३ जुलै

**झरी** : तालुक्यात वेगवेगळ्या ठिकाणी वृक्षारोपण करण्यात आले, शाळा, महाविद्यालये, शासकीय रुग्णालये व सर्व शासकीय व निमशासकीय कार्यालयात अधिकारी, कर्मचारी, व शिक्षक, विध्यार्थी या सर्वांनी सामूहिक वृक्षारोपण करून वृक्ष संवर्धनाचा संकल्प केला. यावेळी तहसीलदार आर. बी. खिरेकार, गटविकास अधिकारी सुभाष चव्हाण, मुकुटबन व पाटण चे ठाणेदार, व झरी तालुका पत्रकार संघटनेच्या वतीने वृक्षारोपण करण्यात आले, वनविभागाने याचे नियोजन गेल्या अनेक दिवसांपासून करून वृक्ष रोपट्यांचा व्यवस्था केली, ग्रामपंचयितीत ही वृक्षारोपण करून पर्यावरण रक्षण व संवर्धन करण्यासाठी अनेकांनी प्रयत्न केले. वसंत इंग्लिश मिडीयम स्कुल मधेही मुख्याध्यापक अनंत राऊत व विद्यार्थ्यांनी वृक्षारोपणाचा कार्यक्रम हाती घेतला, आता हे वृक्ष जोपासण्याची गरज आहे.

### निवासी शाळा आसरपेंड

**तालुका प्रतिनिधी** / ३ जुलै

**पुसद** : अनुसूचित जाती मुलींची शासकीय निवास शाळा आसरपेंड ता. पुसद येथे कृषिदिनाच्या व १३ कोटी वृक्षलागवड कार्यक्रमांअंतर्गत वृक्षारोपणाचा कार्यक्रम पार पाडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापिका कु. एस.एस. घरजारे तर प्रमुख पाहुणे म्हणून पुसद येथील वनपरिक्षेत्र अधिकारी संदिप गिरी, वनपाल गंगाखेडे सामाजिक वनीकरण विभागाच्या इंगोले मॅडम उपस्थित होत्या. यावेळी बोलतांना गिरी यांनी शाळेच्या 'माझे मुल व मुलांचे झाड' या उपक्रमाची प्रशंसा करीत महाराष्ट्र शासनाच्या १३ कोटी वृक्ष लागवड कार्यक्रमांतर्गत शाळेला वनविभागातर्फे २०० झाडे देण्याचे अभिवचन दिले. प्रत्येकाने किमान एक वृक्ष लावण्याचे आवाहन केले. याप्रसंगी प्रा. स्वाती दळवी, प्रा. कोठाळे, प्रा. डॉ. राजेश काळे उपस्थित होते. संपूर्ण विद्यार्थींनी शिक्षक व कर्मचारी हजर होते.

Wed, 04 July 2018
deshonnati.digitaledition.in/c/30074424



दारव्हा : येथील मुंगसाजी महाराज महाविद्यालयात वृक्षारोपण करताना संस्थेच्या सचिव डॉ. संगीता घुईखेडकर व उपस्थित मान्यवर.

## मुंगसाजी महाराज महाविद्यालयात वृक्षारोपण

**दारव्हा** : वृक्षारोपण सप्ताहांतर्गत मंगळवारी (ता. तीन) येथील मुंगसाजी महाराज महाविद्यालयाच्या रासेयो विभागातर्फे वृक्षारोपणाचा कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी संस्थेचे अध्यक्ष वसंत घुईखेडकर यांनी वृक्षारोपण करून कार्यक्रमाची सुरवात केली. प्रमुख पाहुणे म्हणून उपविभागीय पोलिस अधिकारी डॉ. नीलेश पांडे, संस्था सचिव डॉ. संगीता घुईखेडकर, प्राचार्य डॉ. व्ही. बी. राऊत, डॉ. संतोष चतुर, डॉ. सुनील आखरे, कार्यक्रम अधिकारी डॉ. शंकर सावंत, सहायक कार्यक्रम अधिकारी डॉ. मनिष मोहरील आदींची उपस्थिती होती. यावेळी मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपणाचा कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमात प्रा. प्रियांका रुईकर, प्रा. कुरेशी, डॉ. रशिदी, प्रा. सुषमा गावंडे, प्रा. डॉ. सुभाष जाधव, प्रा. सुनील चकवे, प्रा. रवी बोरकर, प्रा. संदीप भुरले, प्रा. खुशाल ढवळे, डॉ. अरविंद लाडोळे आदींनी वृक्षारोपण कार्यक्रमात सहभाग नोंदविला. यशस्वितेसाठी विकास पाईकराव, मेहुल गोहेल, रूपेश वाढोणकर, वैभव माने, सागर भरभडे आदींनी पुढाकार घेतला.

## *Blood Donation Camp*









# मुंगसाजी महाराज महाविद्यालय येथे रक्तदान शिबिर

**शहर प्रतिनीधी/ ८मार्च**

**दारव्हा:** स्थानीक मुंगसाजी महाराज महाविद्यालय येथे ५ मार्चला विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष वसंतरावजी घुईखेडकर यांच्या वाढदिवसाचे औचीत्य साधुन राष्ट्रीय सेवा योजना विभागाद्वारे रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.विलास राऊत तर प्रमुख उपस्थितीमध्ये श्री.वसंतराव घुईखेडकर,कला शाखेचे प्रमुख डॉ.सुनिल चवळे, डॉ.संतोष चतुर, डॉ.यादव सोळंके, प्रा.सुनिल डंभारे, प्रा.संदीप भुरले, प्रा.नितीन भिंगारे उपस्थित होते. तसेच वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे रक्त संकलन केन्द्राचे डॉ.स्मिता गवळी, मोबीन दुर्गे, राहुल मोयर, डोळस उपस्थित होते.

यावेळी वसंतराव घुईखेडकर यांनी रक्तदात्यांचे अभिनंदन केले. महाविद्यालयाच्या ४५ विद्यार्थ्यांनी यावेळी रक्तदान केले. कार्यक्रमाचे संचालन रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ.शंकर सावंत यांनी तर प्रास्तावीक डॉ.मनिष मोहरिल यांनी केले. महीला कार्यक्रम अधिकारी प्रा. कु. कुरेशी यांनी आभार प्रदर्शन केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी रासेयो च्या कार्यक्रम अधिकारी आणि विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

ePaper देशोन्नती Fri, 09 March 2018
deshonnati.digitaledition.in//c/26880853

*Gandhi Vichar Examination Award*


गाँधी रिसर्च फाउण्डेशन
गाँधी तीर्थ, जैन हिल्स, जलगाँव - ४२५००१.
www.gandhifoundation.net

गाँधी विचार संस्कार परीक्षा
२०१८-१९

यशस्वी आयोजन हेतु

स्मृतिचिह्न

मुंगसाजी महाराज महाविद्यालय,
दारव्हा, जि.यवतमाळ

## *Gram Swachhata Photographs*

**Important of Water Conservation**
**Date: 16-01-2018**






**'Save Water Save' Tree Programme**
**Date:- 22-09-2018**





# मुंगसाजी महाराज महाविद्यालय, दारव्हा

दारव्हा - येथील मुंगसाजी महाराज महाविद्यालयात नेर येथील नेहरु महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे 'सेव्ह वॉटर-सेव्ह ट्री' कार्यक्रम घेण्यात आला. अध्यक्षस्थानी डॉ.सुनील चकवे होते. डॉ.विष्णू कुटे, डॉ.व्ही.ए.खोडस्कर, डॉ.पी.एच.चव्हाण यांनी मार्गदर्शन केले. संचालन मंगेश धुरंधर, प्रास्ताविक रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ.शंकर सावंत यांनी तर आभार प्रा.प्रियंका रुईकर यांनी मानले. यशस्वीतेसाठी डॉ.संतोष चतुर, प्रा.संदीप भुरले, प्रा.नितीन भिंगारे, प्रा.रवी बोरकर, प्रा.अख्तरउन्निसा कुरेशी यांनी परिश्रम घेतले.

Hello Yavatmal
Page No. 3 Nov 06, 2018
Powered by: erelego.com

# 'Takau Pasun Tikau' (Best From Waste) Workshop
## Date:- 25-09-2018





२८/०९/२०१८ यवतमाळ शहर विशेष सिंहझेप

पान २

## टाकाऊ वस्तु पासून टिकाऊ वस्तू बनविल्याने प्रदुषण दुर होते - नम्रता राजस

दारव्हा - ता. प्र.

टाकाऊ वस्तु पासून आपल्या उपयोगात येणाऱ्या व टिकाऊ वस्तू कश्या निर्माण करता येतील याचे मार्गदर्शन करतांना टाकाऊ वस्तुंचा उपयोग टिकाऊ वस्तु निर्माण करण्यासाठी केल्यास प्रदुषण निर्माण होणार नाही या दृष्टीने प्रयत्न करावे असे आवाहन प्रमुख मार्गदर्शिका नम्रता राजस यांनी केले. स्थानिक मुंगसाजी महाराज महाविद्यालय येथे राष्ट्रीय सेवा योजना विभाग व कृषि विज्ञान केंद्र सांगली रेलवे यांचे संयुक्त विद्यमाने टाकाऊ पासून टिकाऊ वस्तु तयार करणे या विषयावर आयोजित कार्यशाळेत बोलत होत्या. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे कला शाखा प्रमुख डॉ. सुनिल चकवे, दारव्हाचे वासुदेव चांदुरकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

या प्रसंगी सुनिल चकवे यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. प्रास्ताविक डॉ. वासुदेव चांदुरकर यांनी केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा. प्रियंका रुईकर यांनी तर आभार प्रदर्शन प्रा. शंकर सावन यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. शंकर सावन, प्रियंका रुईकर, डॉ. संतोष पातुर व राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांनी अथक परिश्रम घेतले.

## *Tree Plantation*









### मुंगसाजी महाराज महाविद्यालय दारव्हा

# ठिकठिकाणी वृक्षारोपण

***प्रतिनिधी*** / ३ जुलै

**दारव्हा** : वृक्षारोपण सप्ताहांतर्गत २ जुलैला स्थानिक मुंगसाजी महाराज महाविद्यालय येथे रासेयो विभागातर्फे वृक्षारोपणाचा कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी संस्थेचे अध्यक्ष मा.वसंतराव घुईखेडकर यांनी वृक्षारोपण करुन कार्यक्रमाची सुरुवात केली. प्रमुख पाहुणे म्हणून विभागीय अधिकारी पांडे यांनी सपत्निक वृक्षारोपण केले.

तसेच संस्थेच्या सचिव डॉ. सौ. संगिताताई घुईखेडकर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. बी. राऊत, डॉ. चतुर, डॉ. आखरे, कार्यक्रम अधिकारी डॉ. सावंत, सहा.कार्यक्रम अधिकारी डॉ. मोहरील, महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. कु. रुईकर, प्रा. कु. कुरेशी, डॉ. कु. रशिदी, प्रा. वाकोडे, प्रा. सौ. गावंडे, प्रा. सौ. महल्ले, प्रा. डॉ. जाधव डॉ. चक्वे, प्रा. बोरकर, प्रा. भुरले, प्रा. कु. कुमरे, प्रा. ढवळे, प्रा. भिंगारे, डॉ. लाडोळे, यांनी ही वृक्षारोपण कार्यक्रमात सहभाग नोंदवला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरीता विकास पाईकराव, मेहुल गोहेल, रुपेश वाढोणकर, वैभव माने, सागर मरभडे, सावंत, वैद्य आदींनी परीश्रम घेतले.

### पत्रकार संघटना झरी

***प्रतिनिधी*** / ३ जुलै

**झरी** : तालुक्यात वेगवेगळ्या ठिकाणी वृक्षारोपण करण्यात आले, शाळा, महाविद्यालये, शासकीय रुग्णालये व सर्व शासकीय व निमशासकीय कार्यालयात अधिकारी, कर्मचारी, व शिक्षक, विध्यार्थी या सर्वांनी सामूहिक वृक्षारोपण करून वृक्ष संवर्धनाचा संकल्प केला. यावेळी तहसीलदार आर. बी. खिरेकार, गटविकास अधिकारी सुभाष चव्हाण, मुकुटबन व पाटण चे ठाणेदार, व झरी तालुका पत्रकार संघटनेच्या वतीने वृक्षारोपण करण्यात आले, वनविभागाने याचे नियोजन गेल्या अनेक दिवसांपासून करून वृक्ष रोपट्यांचा व्यवस्था केली, ग्रामपंचयितीत ही वृक्षारोपण करून पर्यावरण रक्षण व संवर्धन करण्यासाठी अनेकांनी प्रयत्न केले. वसंत इंग्लिश मिडीयम स्कुल मधेही मुख्याध्यापक अनंत राऊत व विद्यार्थ्यांनी वृक्षारोपणाचा कार्यक्रम हाती घेतला, आता हे वृक्ष जोपासण्याची गरज आहे.

### निवासी शाळा आसरपेंड

***तालुका प्रतिनिधी*** / ३ जुलै

**पुसद** : अनुसूचित जाती मुलींची शासकीय निवास शाळा आसरपेंड ता. पुसद येथे कृषीदिनाच्या व १३ कोटी वृक्षलागवड कार्यक्रमांअतर्गत वृक्षारोणाचा कार्यक्रम पार पाडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापिका कु. एस.एस. घरजारे तर प्रमुख पाहुणे म्हणून पुसद येथील वनपरिक्षेत्र अधिकारी सदिप गिरी, वनपाल गंगाखेडे सामाजिक वनीकरण विभागाच्या इंगोले मॅडम उपस्थित होत्या. यावेळी बोलतांना गिरी यांनी शाळेच्या 'माझे मुल व मुलांचे झाड' या उपक्रमाची प्रशंसा करीत महाराष्ट्र शासनाच्या १३ कोटी वृक्ष लागवड कार्यक्रमांतर्गत शाळेला वनविभागातर्फे २०० झाडे देण्याचे अभिवचन दिले. प्रत्येकाने किमान एक वृक्ष लावण्याचे आवाहन केले. याप्रसंगी प्रा. स्वाती दळवी, प्रा. कोठाळे, प्रा. डॉ. राजेश काळे उपस्थित होते. संपूर्ण विद्यार्थीनी शिक्षक व कर्मचारी हजर होते.


ePaper देशोन्नती Wed, 04 July 2018
deshonnati.digitaledition.in/c/30074424

## *Awareness Programme*








सकाळ

# केरळ येथील पूरग्रस्तांसाठी दारव्हा शहरात मदतफेरी

### मुंगसाजी महाराज महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा पुढाकार

**सकाळ वृत्तसेवा**

दारव्हा, ता. ३१ : स्थानिक मुंगसाजी महाराज महाविद्यालय राष्ट्रीय सेवा योजना व दारव्हा, येथील विविध सामाजिक संघटनांद्वारे केरळमधील पूर पीडितांसाठी गुरुवारी (ता. ३०) मदत रॅली काढण्यात आली.

याप्रसंगी रॅलीच्या सुरुवातीला डॉ. अजय दुबे, ठाकूर, पांडे, राजेश जाधव आदी मान्यवरांनी आपले विचार व्यक्त करून केरळ पूर पीडितांसाठी मदत करण्याचे आवाहन दारव्हावासींना केले. त्यानंतर रॅली बचत भवन येथून रॅली पोष्ट ऑफीस, शिवाजी चौक, मेन लाईन, अंबादेवी मंदिर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा, गोळीबार चौक, बसस्टॅन्ड, दिग्रसचौक आदी प्रमुख मार्गाने रॅली जाऊन पूर पीडितांसाठी आर्थिक मदत मागण्यात आली. रॅलीचा समारोप दिग्रस चौकात करण्यात आला. मदतीची रक्कम ६९ हजार ५८७ नायब तहसीलदार दारव्हा यांच्याकडे सुपूर्द करण्यात आली.

रॅलीच्या यशस्वितेसाठी विविध सामाजिक व मुंगसाजी महाराज महाविद्यालय दारव्हाचे प्राचार्य डॉ. विलास राऊत, डॉ. संगिता घुईखेडकर, रासेयोचे स्वयंसेवक, कार्यक्रम अधिकारी डॉ. शंकर सावंत, डॉ. मनिष मोहरील, महिला कार्यक्रम अधिकारी प्रियंका रुईकर, सुषमा गावंडे, डॉ. संतोष चतूर, डॉ. सुभाष जाधव, डॉ. अरविंद लाडोळे यांच्यासह विद्यार्थी-विद्यार्थिनी व प्राध्यापक, आदींनी पुढाकार घेतला.

Nagpur, Yavatmal-Today
01/09/2018 Page No. 3

**Session 2019-2020**

*Yoga Photographs*

















D.S.V.V


One Day Workshop on
Venue:- Seminar Hall
Organized by:- IQAC, Dept. Of Spo




सकाळ

# जिल्ह्यात आंतरराष्ट्रीय योगदिन उत्साहात

सकाळ वृत्तसेवा

**यवतमाळ, ता. २१ : जिल्ह्यात ठिकठिकाणी शुक्रवारी (ता. २१) आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यामध्ये शाळा-महाविद्यालयांसह, विविध सेवाभावी संस्था, संघटना, योग वर्गांचे सदस्य व आबालवृद्ध सहभागी झाले होते.**



## मुंगसाजी महाविद्यालयात मार्गदर्शन

**दारव्हा :** मुंगसाजी महाराज महाविद्यालयातील शारीरिक शिक्षण विभाग व राष्ट्रीय सेवा योजना विभागाद्वारे महाविद्यालयाच्या प्रांगणात आंतरराष्ट्रीय योग दिनाचे आयोजन करण्यात आले होते.

आंतरराष्ट्रीय योगदिनासाठी योग प्रशिक्षिक म्हणून डॉ. अश्विनी भेंडे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी योगासंबंधी त्यांनी मार्गदर्शन केले. त्यामध्ये योग प्रशिक्षण घेताना योगाच्या आठ अवस्था कोणत्या व या अवस्थांची सुरुवात कशाप्रकारे करावी, याचे मार्गदर्शन केले. तसेच योगासनामधील वेगवेगळ्या प्रकारची योगासनांची प्रात्यक्षिके करून दाखविली. त्यामध्ये ताडासन, मुक्तासन, वक्रासन, मुक्त पवनासन, प्रार्थना, मानेचा व्यायाम, मेरुदंड व्यायाम, अर्ध बैठक आसन, हस्तपादासन, दंडासन, भद्रासन, त्रिकोणासन, शशांकासन, मकरासन, भुजंगासन, उत्तानपादासन, सेतुबंधासन, ध्यान, शवासन आदि आसनांचे प्रकार शिकविले. तसेच अनुलोम-विलोम व प्राणायाम यावरसुद्धा भर दिला. योग शिबिरात महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसह अनेकांनी योगाचे धडे गिरविले. या प्रशिक्षण शिबिराचे संचालन शारीरिक शिक्षण विभागाचे प्रमुख प्रा. सुनील डंभारे तर आभार रासेयोचे डॉ. शंकर सावंत यांनी मानले. शिबिरासाठी प्राचार्य डॉ. विलास राऊत यांच्या मार्गदर्शनात प्रा. सुनील डंभारे, डॉ. प्रशांत वागेश्वर व डॉ. शंकर सावंत आदींसह प्राध्यापक व कर्मचाऱ्यांनी पुढाकार घेतला. तालुक्यातील जिल्हा परिषद, नगर परिषद, माध्यमिक शाळा व महाविद्यालयांमध्ये योग दिन मोठ्या प्रमाणात साजरा करण्यात आला. अनेक शाळांमध्ये सकाळीच शिक्षकांसह विद्यार्थीही दाखल झाले. येथील तहसील कार्यालयातर्फे तहसीलदार अरुण शेलार यांचे सूचनेनुसार स्थानिक शिवाजी स्टेडियम येथे योग दिनाचे आयोजन करण्यात आले होते. यासह तालुक्यातील विविध शासकीय कार्यालयांमध्येही योग दिन साजरा करण्यात आला.

## वणीत पालिकेत योग

**वणी :** आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त वणी येथे विविध ठिकाणी योग साधनेचे वर्ग घेऊन योग दिन साजरा करण्यात आला. नगर पालिकेतर्फे पालिकाप्रांगणात पदाधिकारी, अधिकारी, कर्मचारी व शिक्षकवृंदासाठी योग वर्गाचे आयोजन करण्यात आले होते. हा योगवर्ग योगशिक्षक संजय आस्वार यांनी घेऊन विविध प्राणायाम घेऊन शास्त्रशुद्ध योग करण्याचे प्रात्यक्षिक करून घेतले. नगर परिषदेचे अध्यक्ष तारेंद्र बोर्डे, उपमुख्याधिकारी कृष्णा देवरे, सभापती, नगरसेवक, कर्मचारी व शिक्षकवृंद सहभागी झाले होते. भारत स्वाभिमान ट्रस्ट व पतंजली योग सेवा समितीद्वारे येथील एस. बी. लॉनमध्ये योग दिवस साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात शहरातील गणमान्य व्यक्ती, पदाधिकारी व अधिकारी उपस्थित होते.

पहाटे ५.३० ते ७ या वेळात पार पडलेल्या योग वर्गात सहसंयोजक गुलाब खुसपुरे, योगशिक्षक लक्ष्मण इद्दे, रमेश बोबडे यांनी मार्गदर्शन केले.

## समर्थ विद्यालयात घाटंजी येथे योग दिन

**घाटंजी :** ५ व्या आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त ४७ महाराष्ट्र बटालियन एनसीसी यवतमाळ युनिट-श्री समर्थ विद्यालय घाटंजी येथे शालेय प्रांगणात सकाळी योगदिनाचे आयोजन करण्यात आले होते. व्यायाम, प्राणायाम आणि ध्यान याविषयी माहिती आणि प्रात्यक्षिकपर मार्गदर्शन सतीश रामगडे यांनी केले. कार्यक्रमाचे आयोजन एनसीसी ऑफीसर लक्ष्मण कानकाटे यांनी केले होते. यावेळी मुख्याध्यापिका ठाकूर, मांडे, जकाते, भवरे, राठोड, मदने, वैद्य, हेमके, वाशा व इतर शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## वसंतराव नाईक जैवतंत्रज्ञान विद्यालय

**यवतमाळ :** वसंतराव नाईक जैवतंत्रज्ञान महाविद्यालय यवतमाळ येथे जागतिक योग दिवसाचे औचित्य साधून १७ ते २१ असे पाच दिवस योगाभ्यास घेऊन शुक्रवारी (ता. २१) समारोप करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र गाडे होते. डॉ. साहेबराव साखरे यांनी प्रात्यक्षिकाच्या माध्यमातून योगाभ्यासाचे धडे दिलेत. डॉ. धीरज वसुले, डॉ. रवींद्र सातभाई, डॉ. पांगोटे आदींसह प्राध्यापक, विद्यार्थी उपस्थित होते.

## शिवाजी विद्यालय, यवतमाळ

**यवतमाळ :** शिवाजी विद्यालयात सकाळी सात वाजता शारीरिक शिक्षक मनोज येंडे यांच्या मार्गदर्शनात विद्यालयातील शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थ्यांनी सामूहिक प्रार्थनेनंतर योगासनाचे विविध प्रकार केले. निरोगी जीवन जगण्यासाठी नियमित योगासने करणे काळाची गरज असल्याचे प्रतिपादन उपस्थित मान्यवरांनी केले. यावेळी मुख्याध्यापिका सुहासिनी शेंडे, पर्यवेक्षक जी. एस. कापसे तसेच सर्व शिक्षक, विद्यार्थी व कर्मचारी उपस्थित होते.



दारव्हा : मुंगसाजी महाराज महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त योगाचे धडे घेताना कर्मचारी व विद्यार्थी.



वणी : पालिकेच्या प्रांगणात योग करताना अधिकारी कर्मचारी.



आर्णी : योगाचे धडे देताना मार्गदर्शक विश्वास सवने.

## सायकलस्वारांनी घेतले योगाचे धडे

**आर्णी :** 'सायकल चालवा पर्यावरणाचे रक्षण करा', असा संदेश देणाऱ्या आर्णी सायकलींगच्या सदस्यांनी शुक्रवारी (ता. २१)सकाळी सहा वाजता योग दिनाचे औचित्य साधून 'नियमित योग करा आणि निरोगी रहा' असा संदेश दिला. नियमित सायकल चालवून पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या सायकलींग क्लबच्या सदस्यांनी योगासनाचे धडे घेऊन सुदृढ आरोग्य राखण्यासाठी स्वतःसह इतरांनाही प्रोत्साहित केले आहे. रोगमुक्त होण्यासाठी नियमित योगासने करणे आवश्यक असल्याचे मार्गदर्शन विश्वास सवने यांनी सायकलींग क्लबच्या सदस्यांना केले.

Nagpur, Yavatmal-Today
22/06/2019 Page No. 4

# *Cleanliness/Environment Programme Photographs*

## Swachhata Pandharvada








**लोकमत**



दारव्हा येथील बसस्थानक व परिसरात स्वच्छता अभियान राबविताना महाविद्यालयाचे विद्यार्थी.

### दारव्हा बसस्थानकात स्वच्छता अभियान

दारव्हा : येथील मुंगसाजी महाराज महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे स्वच्छता व वृक्षसंवर्धन रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. डॉ.सुनील चकवे यांनी रॅलीला झेंडी दाखविली.

प्रथम महाविद्यालयासमोरील वसाहतीत स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. नंतर उपजिल्हा रुग्णालय, न्यायालय परिसर, बसस्थानक परिसरात स्वच्छता केली. रॅलीत विद्यार्थ्यांनी घोष वाक्यांच्या माध्यमातून स्वच्छता व वृक्ष संवर्धनाबाबत जनजागृती केली.

रॅलीत अंकुश चव्हाण, सुबोध दहीलेकर, सचिन राठोड, प्रवीण सुलताने, निरज राठोड, दिनेश जाधव, विजय दिवे, रतन गायकवाड, प्रतिक फेंडर, अविनाश बर्डे, नम्रता निमकर, अनुराधा आमटे, वैष्णवी राठोड, वैष्णवी जवके, श्वेता काळे, श्रेया काळे, शिवानी राजूरकर आदी सहभागी होते. संस्थेच्या सचिव डॉ.संगिता घुईखेडकर, प्राचार्य डॉ.विलास राऊत यांच्या मार्गदर्शनात रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ.शंकर सावंत, प्रा.प्रियंका रुईकर, प्रा.अख्तररुन्निसा कुरेशी यांच्यासह कर्मचारी व विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

Hello Yavatmal
Page No. 3 Sep 10, 2019
Powered by: erelego.com


राष्ट्रीय सेवा योजना
स्वच्छता पंधरवाडा
मागासवर्गी परिसर स्वच्छता




राष्ट्रीय सेवा योजना
मागासवर्गी परिसर स्वच्छता


राष्ट्रीय सेवा योजना
स्वच्छता पंधरवाडा
क्रांती दिन व व्याख्यान
DARWHA



सकाळ

# घोषवाक्यातून स्वच्छतेसह वृक्षसंवर्धनाचा जागर

## दारव्हा येथील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचा पुढाकार; रॅलीने वेधले नागरिकांचे लक्ष

सकाळ वृत्तसेवा

दारव्हा, ता. १७ : स्थानिक मुंगसाजी महाराज महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेकडून शहरात स्वच्छता व वृक्षसंवर्धन रॅलीचे आयोजन करण्यात आले. घोषवाक्य लिहिलेल्या फलकाद्वारे स्वच्छतेसह वृक्षसंवर्धनाचा शहरभर जागर करीत विद्यार्थ्यांच्या रॅलीने शहरवासीयांची मने जिंकली.

















सकाळ

# स्वच्छतेसाठी सर्वांनीच आग्रही असले पाहिजे

## प्रा. डॉ. संगीता घुईखेडकर : दारव्हा येथे रासेयोतर्फे स्वच्छता पंधरवड्याचे आयोजन

# Swachhata Hich Sewa Pandharvada
# Date:- 15-09-2019 to 02-10-2019














# दारव्हा येथे राष्ट्रीय सेवा योजना दिन

रासेयो दिन कार्यक्रमात उपस्थितांना मार्गदर्शन करतांना मान्यवर

**प्रतिनिधी/** २४ सप्टेंबर

**दारव्हा :** स्थानिक मुंगसाजी महाराज महाविद्यालय येथे २४ सप्टेंबर रोजी राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे रासेयो दिनाचे आयोजन करण्यात आले होते. रासेयो दिनानिमित्त स्वच्छतेवर जनजागृती करण्यासाठी तसेच राष्ट्रीय सेवा योजना प्रति विद्यार्थ्यांमध्ये जागृतता निर्माण करण्यासाठी स्वच्छता जनजागृती व रासेयो उद्बोधन वर्गाचे आयोजन करण्यात आले होते.

याप्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे कला शाखाप्रमुख डॉ. सुनील चकवे तर प्रमुख वक्ते म्हणून डॉ. खुशाल डवले, डॉ. संदीप मुरले, प्रा. रवि बोरकर, डॉ. संतोष चतुर आदींची उपस्थिती होती. याप्रसंगी डॉ. संदीप मुरले, प्रा. खुशाल डवले, प्रा. रवी बोरकर , डॉ. सुनील चकवे यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन सचिन राठोड तर प्रास्ताविक डॉ. शंकर सावंत यांनी व आभार प्रदर्शन जयश्री शेंदूरकर हिने मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेकरिता प्राचार्य डॉ. विलास राऊत यांच्या मार्गदर्शनात डॉ. शंकर सावंत, सहाय्यक कार्यक्रम अधिकारी डॉ. मनीष मोहरील, कार्यक्रम अधिकारी प्रा कु. प्रियंका रुईकर प्रा कु. अख्तरुन्निसा कुरेशी व रासेयो स्वयंसेवकांनी अथक परिश्रम घेतले.

Wed, 25 September 2019
https://deshonnati.digitaledition.in/c/43991602





**कार्यशाळा** • प्रा. राहुल पाटील यांचे प्रतिपादन, मुंगसाजी महाराज महाविद्यालयात स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन

# 'स्पर्धा परीक्षेसाठी ध्येय निश्चित करा'














# मुंगसाजी महाविद्यालयात कार्यशाळा

प्रतिनिधी | दारव्हा


मुंगसाजी महाराज महाविद्यालयात आयोजित कार्यशाळेत उपस्थित मान्यवर.

स्थानिक मुंगसाजी महाराज महाविद्यालय येथील राष्ट्रीय सेवा योजना विभाग, कृषी विज्ञान केंद्र, सांगवीवदारे पिवळे चिकट सापळे, दिवाळी दीप बनविण्याची कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या प्रसंगी कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे कला शाखा प्रमुख डॉ. सुनील चकवे, तर मार्गदर्शक म्हणून डॉ. नंदकिशोर हिरवे, डॉ. विपुल वाघ, प्रा. नम्रता राजस आदी मान्यवर उपस्थित होते.

या प्रसंगी मान्यवरांनी गाडगे महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून अर्पण केला. याप्रसंगी पिवळे चिकट सापळे तयार करण्याचे मार्गदर्शन, प्रात्यक्षिक करून डॉ. विपुल वाघ यांनी दाखविले. पिवळे चिकट सापळे तयार करण्यासाठी लागणारे साहित्य बाजारात कशा प्रकारे उपलब्ध होतील तसेच हे सापळे विद्यार्थ्यांनी स्वतः आपल्या वडीलांना तयार करून द्यावे, असे आवाहन डॉ. वाघ यांनी केले. या प्रकारामुळे वडिलांसह इतरही शेतकऱ्यांचा कीटकनाशक फवारणीचा खर्च वाचेल. तसेच विद्यार्थीनी या सापळ्यांचे मोठ्या प्रमाणात उत्पादन केल्यास ते बाजारात शेतकरी वर्गाकडून खरेदी होऊ शकते. त्या माध्यमातून विद्यार्थ्यांना स्वयं रोजगार प्राप्त होऊ शकतो. तसेच पीक संरक्षणाचा घरबसल्या उपाय करून शेतकऱ्यांच्या लागवड खर्चात बचत होऊ शकते म्हणून विद्यार्थ्यांनी पिवळे चिकट सापळे तयार करून आपल्या शेतकरी बापाला स्वतःचा रोजगार मिळून मदत करावी, असे आवाहन केले.

कार्यशाळेचे दुसरे मार्गदर्शक डॉ. नंदकिशोर हिरवे यांनी मार्गदर्शन करताना स्पष्ट केले, की महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या शेती, रोजगार विषयक गरजेनुसार यापुढेही कार्यशाळा, मार्गदर्शन वर्गाचे आयोजन करण्याबाबत विद्यार्थ्यांनी तसेच संबंधित प्राध्यापकांनी तशी मागणी करावी, असे आव्हान केले.

कार्यशाळेच्या तिसऱ्या मार्गदर्शिका प्रा. नम्रता राजस यांनी दिवाळी दीप तयार करण्याचे मार्गदर्शन, प्रात्यक्षिक करून दाखविले. यावेळी दिवाळी दीप तयार करण्यासाठी लागणारा कच्चा माल उपलब्धची स्थळे, निर्माण झालेल्या दिवाळी दिव्यांची किंमत त्यामुळे वाचणारा पैसा याविषयी मार्गदर्शन केले. स्वतः घरी बनविलेल्या आकर्षक आणि सुंदर दिव्यांमुळे बचत होईल, असे सांगितले. सर्व विद्यार्थी, विद्यार्थिनींनी अशा प्रकारची दिवाळी दीप स्वतः तयार करावे, असे आव्हान केले.

कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी कला शाखा प्रमुख डॉ. सुनील चकवे यांनी मनोगत व्यक्त केले. कार्य शाळेतील प्रशिक्षणाचा विद्यार्थ्यांनी लाभ घेऊन स्वयं रोजगार निर्माण करून आपल्या शेतकरी वडीलांना मदतीचा हातभार लावावा. तसेच यापुढे होणाऱ्या व्यवसाय मार्गदर्शन कार्यशाळेमध्ये विद्यार्थ्यांनी सहभागी होऊन कार्य शाळेतील मार्गदर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले.

कार्यशाळेचे संचालन अंजली कोटम्कर, प्रास्ताविक डॉ. शंकर सावंत, तर आभार वैशाली कराळे हिने मानले. कार्यक्रमाच्या सुरवातीला आचल मिसार या विद्यार्थिनीने पाहुण्यांकरिता स्वागत गीत म्हटले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता कार्यक्रम अधिकारी डॉ. शंकर सावंत, महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. प्रियंका व राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थीनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाला डॉ. खुशाल इंगळे महाविद्यालयातील बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.

**Swachhata Sarvection**
**Date:- 30-01-20**





**Tree Plantation**
**Date:- 01-07-2019**




लोकमत

# दारव्हात वृक्ष लागवड मोहीम

लोकमत न्यूज नेटवर्क

दारव्हा : महाराष्ट्र शासनाच्या वृक्ष लागवड व वृक्षारोपण सप्ताहानिमित्त येथील मुंगसाजी महाराज महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाद्वारे वृक्षारोपणाचा कार्यक्रम घेण्यात आला.

यावेळी संस्थेच्या सचिव डॉ.संगीता घुईखेडकर, प्राचार्य डॉ.विलास राऊत, उपप्राचार्य डॉ.अजय दुबे यांनी वृक्षारोपण करून महाविद्यालयाच्या वृक्षारोपण सप्ताहाची सुरुवात केली. कार्यक्रमाला डॉ.संतोष चतुर, प्रा.संदीप भुरले, डॉ.यादवराव सोळंके, प्रा.अमोल वाकोडे, प्रा.सुषमा गावंडे प्रामुख्याने उपस्थित होते.

याप्रसंगी मान्यवरांनी विद्यार्थ्यांना वृक्ष लागवड व संवर्धनाचे महत्त्व पटवून दिले. यशस्वीतेकरिता राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ.शंकर सावंत, महिला कार्यक्रम अधिकारी प्रा.प्रियंका रुईकर, प्रा.अख्तरुन्नीसा कुरेशी, सिद्धार्थ भगत, भीमराव राऊत, स्वयंसेवक निरज राठोड, अतिष आगोसे, गौरव मोकाशे, सुबोध दहीलेकर, किरीट चव्हाण, आचल मिसार आदींनी परिश्रम घेतले.

Hello Yavatmal
Page No. 3 Jul 13, 2019
Powered by: erelego.com

# *Blood Donation Camp*







लोकमत



शिबिरात रक्तदान करताना विद्यार्थी व उपस्थित घुईखेडकर, शेळके आदी.

## दारव्ह्यात १०४ जणांचे रक्तदान

लोकमत न्यूज नेटवर्क

दारव्हा : मुंगसाजी महाराज महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे पुलवामा हल्ल्यात शहीद झालेल्या जवानांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी आयोजित रक्तदान शिबिरात १०४ दात्यांनी रक्तदान केले.

शिबिराला विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष वसंतराव घुईखेडकर, उत्तमराव शेळके, सुभाष ठोकळ प्रामुख्याने उपस्थित होते. मान्यवरांनी फीत कापून शिबिराचे उद्घाटन केले. संत गाडगेबाबा, अमर जवान ज्योती, माजी आमदार बाळासाहेब घुईखेडकर यांना हारार्पण करून रक्तदान शिबिराची सुरुवात झाली. शिबिरामध्ये १०४ दात्यांनी रक्तदान करून शहीद जवानांना श्रद्धांजली वाहिली.

शहरातील विविध सामाजिक संघटनांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. शिबिराला स्व.वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, यवतमाळच्या रक्तपेढी विभागाचे डॉ.सुमित डांगे, गणेश कानडे, प्रदीप वाघमारे, सुशील ताकतांडे, भाऊ धारशिंबे, भाऊ ठाकरे, भाऊ जाधव यांनी सहकार्य केले. यशस्वीतेसाठी विद्या प्रसारक मंडळाच्या सचिव डॉ.संगीता घुईखेडकर, मुंगसाजी महाराज महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.विलास राऊत यांच्या मार्गदर्शनात डॉ.शंकर सावंत, डॉ.अरविंद लाडोळे, डॉ.सुनील चकवे, डॉ.सुभाष जाधव, प्रा.संदीप भुरले, प्रा.प्रियंका रुईकर, प्रा.अख्तरउन्नीसा कुरेशी, डॉ.मनीष मोहरील तसेच राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी सहकार्य केले. शिबिरात महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी रक्तदान केले.

*Gandhi Vichar Examination Award*



गाँधी रिसर्च फाउण्डेशन

गाँधी तीर्थ, जैन हिल्स, जलगाँव - ४२५००१.

www.gandhifoundation.net

गाँधी विचार संस्कार परीक्षा

२०१९-२०

यशस्वी आयोजन हेतु

स्मृतिचिह्न

मुंगसाजी महाराज महाविद्यालय

दारव्हा, जि. यवतमाळ

बा-बापू१५०

1869-2019

लोकमत

# दारव्हात वृक्ष लागवड मोहीम

लोकमत न्यूज नेटवर्क

दारव्हा : महाराष्ट्र शासनाच्या वृक्ष लागवड व वृक्षारोपण सप्ताहानिमित्त येथील मुंगसाजी महाराज महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाद्वारे वृक्षारोपणाचा कार्यक्रम घेण्यात आला.

यावेळी संस्थेच्या सचिव डॉ.संगीता घुईखेडकर, प्राचार्य डॉ.विलास राऊत, उपप्राचार्य डॉ.अजय दुबे यांनी वृक्षारोपण करून महाविद्यालयाच्या वृक्षारोपण सप्ताहाची सुरुवात केली. कार्यक्रमाला डॉ.संतोष चतुर, प्रा.संदीप भुरले, डॉ.यादवराव सोळंके, प्रा.अमोल वाकोडे, प्रा.सुषमा गावंडे प्रामुख्याने उपस्थित होते.

याप्रसंगी मान्यवरांनी विद्यार्थ्यांना वृक्ष लागवड व संवर्धनाचे महत्त्व पटवून दिले. यशस्वीतेकरिता राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ.शंकर सावंत, महिला कार्यक्रम अधिकारी प्रा.प्रियंका रुईकर, प्रा.अख्तररुन्नीसा कुरेशी, सिद्धार्थ भगत, भीमराव राऊत, स्वयंसेवक निरज राठोड, अतिष आगोसे, गौरव मोकाशे, सुबोध दहीलेकर, किरीट चव्हाण, आचल मिसार आदींनी परिश्रम घेतले.

Hello Yavatmal
Page No. 3 Jul 13, 2019
Powered by: erelego.com

*Awareness Programme on 'Health and Care'*










# Health & Care Guidance Programme
# On Occasion of
# World Woman Day

On Occasion of World Woman Day a guidance programme on "**Health & Care**" was organized by Women Development Cell, Mungsaji Maharaj Mahavidyalaya, Darwha, in collaboration with Doctor's association for Girl's students on 9th March 2019. Dr. T.S.Ware, Anethesist member; District Health Officer ZP Yavatmal was the President of this programme. Dr. Komal Sangani, Dr. Rucha Potphode, Dr.Kanchan Narwade,Dr. Ashwini Bhende Dr. Rakhi Gugliya were guided the students saying that in today's era women carrying the dual responsibility so there is the need and the importance of ***Health Care for Women,***. They stressed on the fact that today's life is too much busy due to indoor and outdoor activities for women. So Yoga plays an important role in maintaining the Health and balancing the life.

Dr.N.A.Rashidi, Co-ordinator of Women Development Cell along with Prof. PB Ruikar Prof. Qureshi, Prof. S.S Gawande , prof. Priyanka Lad were present in the programme. Students graced the programme by their presence.



Rashidi

Dr. N.A. Rashidi
Co-ordinator,
Women Development Cell

9/3/2019

## Health & Care Guidance Programme

## (World Woman Day)

## Photos









Rashidi 09/03/19

Dr. N.A. Rashidi

Co-ordinator,

Women Development Cell

**Session 2020-2021**

***Cleanliness/Environment Programme Photographs***



## *Blood Donation Camp*









# मुंगसाजी महाराज महाविद्यालयातील रक्तदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

प्रतिनिधी | दारव्हा

स्थानिक मुंगसाजी महाराज महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग व यवतमाळ जिल्हा शासकीय रुग्णालयाचे रक्त संकलन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने ५ मार्च रोजी विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष वसंत घुईखेडकर यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजित करण्यात आले.

रक्तदान शिबिराच्या उद्घाटन कार्यक्रमाला अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. सुनील चकवे तर प्रमुख उपस्थितीमध्ये डॉ. सुभाष जाधव, डॉ किशोर हुरडे, डॉ. खुशाल ढवळे, डॉ. संदीप भुरले, डॉ. नितीन भिंगारे, प्यारेलाल भागवत, सुनील डंभारे, प्रा. चेतन पवार, डॉ सुषमा गावंडे, डॉ. नाझिया रशिदी, डॉ. फरहाना आझमी शेख तसेच जिल्हा सामान्य रुग्णालयातील रक्तपेढी विभागाचे जागृती पालव, रक्त संक्रमण अधिकारी, मोबीन दुगे, समाज सेवा अधिकारी, प्रदीप वाघमारे, तंत्रज्ञ, आदर्श खडककर, तंत्रज्ञ, कशीराज मांडवकर, कक्षी परिचारक, दिलीप केराम, प्रयोगशाळा साहाय्यक, विशाल बडे, वाहन चालक आदी उपस्थित होते. सर्व मान्यवरांनी गाडगे महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून हार अर्पण केला व फीत कापून रक्तदान शिबिराचे उद्घाटन केले. उद्घाटन कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानावरून आपले मनोगत व्यक्त करताना महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. सुनील चकवे यांनी रक्तदानाचे महत्त्व विषद करताना रक्तदान श्रेष्ठ दान असून या पुण्य कार्यात महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी सदैव तत्पर राहावे असे आव्हान केले. रक्तदान शिबिरामध्ये महाविद्यालयातील ३१ विद्यार्थ्यांनी रक्तदान केले. या ३१ विद्यार्थ्यांमध्ये आर्ट फॅकल्टी मधून १७ विद्यार्थ्यांनी तर कॉमर्स फॅकल्टी मधून सात विद्यार्थ्यांनी तर सायन्स फॅकल्टी मधून सात विद्यार्थ्यांनी रक्तदान करून सामाजिक व राष्ट्रीय कार्यात सहभाग नोंदवला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रासेयो स्वयंसेविका श्रेया काळे तर प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. शंकर सावंत तर आभार प्रदर्शन राष्ट्रीय स्वयंसेवक प्रवीण सुलताने यांनी व्यक्त केले. यशस्वितेकरिता महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विलास राऊत व विद्या प्रसारक मंडळाच्या सचिव डॉ. संगीता घुईखेडकर यांच्या मार्गदर्शनात रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. शंकर सावंत, डॉ. मनीष मोहरील, महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. प्रियंका रूईकर, डॉ. अख्तर रुन्निसा कुरेशी यांनी तसेच रासेयोच्या स्वयंसेवक व स्वयंसेवकांनी अथक परिश्रम घेतले. सोबतच रक्त संकलन केंद्र जिल्हा शासकीय रुग्णालय यवतमाळच्या चमूचे रक्तदान शिबिर आखता अमूल्य असे सहकार्य लाभले.

दिव्य मराठी विशेष • सिद्धांत राठोड यांचे मनोगत; जनता विद्या

# *Gram Swachhata Photographs*






***Tree Plantation***

# मुंगसाजी महाराज महाविद्यालयात रासेयोच्या वतीने लावण्यात आली झाडे




**प्रतिनिधी** | यवतमाळ

स्थानिक मुंगसाजी महाराज महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने शुक्रवार, दि. ९ जुलै रोजी वृक्षारोपण करण्यात आले.

याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विलास राऊत, उपप्राचार्य डॉ. सुनील चकवे यांच्या हस्ते वृक्षारोपणाची सुरुवात महाविद्यालयाच्या परिसरात करण्यात आली. तसेच रा.से. यो. कार्यक्रम अधिकारी डॉ. मनीष मोहरील, सहाय्यक कार्यक्रम अधिकारी प्रा. रवी बोरकर, महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. प्रियांका रुईकर, डॉ अखतररुन्निसा कुरेशी, माजी रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी डॉ. शंकर सावंत, डॉ. नितीन भिंगारे, डॉ. संतोष चतुर ,डॉ. खुशाल ढवळे डॉ. सुनील डंभारे डॉ. संदीप भुरले, डॉ. अमोल वाकोडे, डॉ. नाझिया रशीदी, गौतम भगत, सुनील अगमे आणि रासेयो. स्वयंसेवकांनी सक्रियपणे भाग घेतला. परिसरात एकूण ५० वृक्षलागवड करण्यात आली.

*Awareness Programme on ‘Acts on Women Harassment and Child Abuse’*

# Report of Awareness Program on
# “Acts on Women Harassment and child Abuse”
## Under “Women Equality And Gender Sensitization”

Organized by

Women Development Cell And Dept. Of Chemistry

Mungasaji Maharaj Mahavidyalaya, Darwha

Topic of Activity- **“Acts on Women Harassment and child Abuse.”**
Invited Guest - **Advocate Ms. Nagma Shaikh**
Venue of Activity- **Virtual Mode (Zoom Platform)**
Date & Time – **09th Feb 2021**

IUPAC has globally organized **Women Breakfast** for empowering women on **9th February**-2021 on Virtual platform. Association of Chemistry has promoted this program in India.

I am pleased to present the report of Awareness Program under **“Women Equality And Gender Sensitization” on topic "Acts on Women Harassment And Child Abuse"** organized by **Women Development Cell And Dept. Of Chemistry**, Mungsaji Maharaj Mahavidyalaya, Darwha under **Women's Breakfast** for Arts, commerce & science faculties students on **09th Feb -2021 in virtual mode looking to the covid situation.**

Dr. Vilas B. Raut, Principal M. M. College, Darwha was the President, Advocate Ms. Nagma Shaikh was the chief guest and speaker of this programme, while Asso. Prof. Dr. Nazia A. Rashidi, Dr. Akhtarunisa. N. Qureshi, Dr. Farhana Shaikh, Ms. Vaishali Kumare, Ms. N. D. Mahurkar were present during the programme.

Dr. Nazia.A.Rashidi, HOD Chemistry, M.M.College, Darwha, Co-ordinator of Women Development Cell conducted the whole programme, introduced the guest as well as explained the need and the importance of organizing such awareness program especially for Girls students. Advocate Ms. Nagma Shaikh talked on very important and sensitive topic **“Acts on Women Harassment and child Abuse.” And** made the students aware about meaning of “**Harassment, Abuse and Assault, also defined what is Good /Bad Touch?** What is the protection of child seual assult?? In a simple way giving live examples she explained in detail what is the meaning of pocso? She informed students about the different laws and punishment against accused person (EX. Sec. 354, Sec.376 etc….). Dr. Vilas B. Raut addressed to the students in his presidential speech saying **“Be Bold”.** Also he said there is great need of organizing such awareness program especially for Girls students in colleges so that students should not have any fear in their mind while coming to the college and going outside their homes and should not face any problem. He appreciated Advocate Ms. Nagma Shaikh the way she presented the topic in front of students. At the last Dr. A. N. Qureshi proposed the Vote of Thanks. Students also showed the great response to the programme by their presence in virtual mode. **122 students** get registered for the program and filled the feedback form.

11/02/2021

**Co-ordinator**
Women Development Cell

**Principal**
M.M. College,Darwha
Mungsaji Maharaj Mahavidyalay
Darwha, Dist. Yavatmal


WOMEN DEVELOPMENT CELL
Mungsaji Maharaj Mahavidyalaya Darwha


Under
Sant. Gadge Baba Amravati
Amravati
WOMEN DEVELOP
CELL
Mungsaji Maharaj
Darwha
10.30 am to 4.00 pm

# Celebration of International Women Day- 2020

## Women Development Cell

Mungsaji Maharaj Mahavidyalaya, Darwha

International Women Day- 2020 was celebrated at MungasajiMaharajMahavidyalaya, Darwha on 07th March 2020.The programme was presided by Dr. V. B. Raut, Principal M.M. College,Darwha. On this occasion Adv.Vaishali Hire, Mr. Rahul Mate (LIC Agent), Dr. S.B.Chakave and Dr. Sau.SushmaGawandewere present as a cheif Guest. The programme was conducted by the Dr. Nazia A. Rashidi, co-ordinator of Women Development cell, M.M.College, Darwha.

Adv.Vaishali Hire guided students about the different laws for the **safety and security of Women**. Also she said that today's women are so much strong that they do not need any law for their security. She also appeals girl students to **"Be Bold"**. Mr. Rahul R. Mate guided students on topic "How to be Financially Strong". Dr. SauSushmaGawande told that student should behave as a responsible one because they are the hopes of their parents. Dr. V.B.Raut, president of this programme addressed student that they should be independent by acquiring higher education. Dr. Nazia A. Rashidi delivered the introductory speech and explained the theme of **International Women Day (08-march)- 2020 –" I am Generation Equality: Realizing Women Rights."**

On this occasion Ku. PrachiYewale and Ku.ShivaniBhoyarfrom B.Sc. III year presented poem based on Womens theme.Our second year students Ku.HarshadaRathod, Amisha Patel, Mr. Patel Bansi, MrNayanRaut, Mr. JaydeepJadhao,Ku.SakshiGawandevery nicely and effectively presented a play on theme" Stop Acid Attack".

This programme was held in the presence of Dr. P.D. Bageshwar, Dr.Qureshi, Prof. Ruikar, Dr.FarhanaAzami, Prof. Mahurkar, Prof. Kothekar, Prof .Dasud, Prof. Naikwad, Prof.Ku.Nimkar, Prof. Ku. PallaviTawade. The programme was conducted by Prof. FarkundaMirza. Dr. Nazia A Rashidi delivered the introductory speech and Vote of Thank proposed by Dr. A.N. Qureshi.

9/03/2020

Co-ordinator

Women Development Cell

Principal
Mungsaji Maharaj Mahavidyalay
Darwha, Dist. Yavatmal

Mungsaji Maharaj Mahavidyalay, Darwha Dist. Yavatmal — Seal

Principal
Mungsaji Maharaj Mahavidyalay
Darwha Dist. Yavatmal